# वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ

कृषि नगर, वसमत रोड,
परभणी - ४३१ ४०२ (महाराष्ट्र)

| | | | |
|---|---|---|---|
| ई-मेल | : reg_mau@rediffmail.com | दूरध्वनी | : (०२४५२) २२९७५५ |
| वेबसाईट | : www.vnmkv.gov.in | फॅक्स | : (०२४५२) २२९७५५,२२३५८२ |


**संदर्भ:** १. कृषि परिषद, पुणे यांचे पत्र क्र.मकृप/शिक्षण-१६/का-२/१५८५/०६, दि.१३ सप्टेंबर,२००६
२. सामान्य प्रशासन विभागाची अधिसूचना क्र. आरटीआर-२०१४/प्र.क्र.३५५/का-१२ दि. ०६ जून,२०१७ व अधिसूचना क्र. आरटीआर-२०१७/प्र.क्र.३६६/का-१२, दि. ११ जून,२०१९
३. कृषि परिषद, पुणे यांचे पत्र क्र.मकृप/आस्था-३/न.क्र.११९/२०४८/२०१७ दि.२२ ऑगस्ट,२०१७

**क्रमांक२०२२/सं.क्र.४९९/आस्था-३ | 2756** **दिनांक ३०/०६/२०२२**

## परिपत्रक

उपरोक्त संदर्भ क्र.०१ वरील पत्रान्वये, महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषदेच्या दि.२४ जुलै,२००६ रोजी झालेल्या ६९ व्या बैठकीमध्ये कृषि विद्यापीठांतर्गत लिपीकवर्गीय पदांची शैक्षणिक अर्हता निश्चित करण्यात आलेली आहे. संदर्भ क्र. २ वरील शासन अधिसूचनेनुसार कनिष्ठ लिपीक संवर्गाच्या शैक्षणिक अर्हतेमध्ये बदल करण्यात आले असून, सदरील सुधारीत शैक्षणिक अर्हता खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | कनिष्ठ लिपीक संवर्गाची सध्याची शैक्षणिक व तांत्रिक अर्हता | शासन अधिसूचना दि.०६ जून,२०१७ व दि.११ जून,२०१९ नुसार शैक्षणिक व तांत्रिक अर्हतेत करण्यात आलेले बदल. |
|---|---|---|
| १ | एस.एस.सी. किंवा तत्सम परीक्षा उत्तीर्ण | **सांविधिक विद्यापीठाची कोणत्याही शाखेतील पदवी किंवा शासनाने त्याच्याशी समतुल्य म्हणून घोषित केलेली अन्य कोणतीही अर्हता;**<br>***तथापि*** *दि. ०६ जून,२०१७ पूर्वी गट-ड मधील पद धारण करणाऱ्या आणि ज्यांनी माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण केली आहे, आणि ज्यांनी मराठी टंकलेखनाचे किमान ३० श.प्र.मि. किंवा इंग्रजी टंकलेखनाचे किमान ४० श.प्र.मि. वेगमर्यादेचे शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र किंवा संगणक टंकलेखनाचे प्रमाणपत्र धारण केले आहे, अशा कर्मचाऱ्यांचा देखील पदोन्नतीसाठी दि.०६ जून,२०१७ पासून* ***पुढील पाच वर्षापर्यंत*** *विचार करता येईल.* |
| २ | शासकीय मान्यताप्राप्त इंग्रजी ४० श.प्र.मि. आणि मराठी ३० श.प्र.मि. परीक्षा उत्तीर्ण | मराठी टंकलेखनाचे किमान ३० श.प्र.मि. **किंवा** इंग्रजी टंकलेखनाचे किमान ४० श.प्र.मि. वेगमर्यादेचे शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र किंवा संगणक टंकलेखनाचे प्रमाणपत्र. |

कनिष्ठ लिपीक संवर्गाच्या शैक्षणिक व तांत्रिक अर्हतेमध्ये वरीलप्रमाणे करण्यात आलेले बदल हे दि. ०६ जून,२०१७ पासून लागू राहतील. तसेच संदर्भीय अधिसूचनेतील नमूद केलेल्या इतर बाबी प्रकरण परत्वे जशाच तशा लागू राहतील.

**मा. कुलगुरू महोदय यांच्या मान्यतेने,**

३०।६।२२

**(धिरजकुमार रा. कदम)**
**कुलसचिव**

*मागील पानावर...*